# अधिकार तैसा करू उपदेश

सामान्य विचारी माणूस स्वतःच्या जिज्ञासेने किंवा संत, ग्रंथ, संप्रदाय अगर परिचित साधकाच्या संगतीने अंतर्मुख होऊन जेव्हा ह्या जगताच्या स्वरूप चा, आयुष्याच्या हेतूचा व जीवनाच्या अर्थाचा विचार करू लागतो तेव्हा त्याची ह्या सर्वांकडे बघण्याची दृष्टी कशी असते ? जगत दिसते तसेच्या तसे खरे असून ते भेदाने भरलेले आहे असे त्याला वाटते. आधुनिक शास्त्रे जाणणारा माणूस जग निसर्गनिर्मित आहे असे समजतो. थोडे संतसस्कार असलेला ते देवाने निर्माण केले आहे असे मानतो. पण ही दोन्ही मते अपूर्ण विचारातून किंवा थोडंफार ऐकून तयार झालेली असतात. जीवन जगताना आपली व्यावहारिक योग्यता वाढवून शक्य तो अधिक सत्ता, संपत्ती, कीर्ती, यश व विषयसुखे मिळवावीत एवढाच आयुष्याचा हेतू असल्यासारखे वाटते. वाटयाला आलेल्या जीवनात जास्तीत जास्त उत्कर्ष साधून शक्यतेप्रमाणे इतरांना सांभाळून, मदत करून, दुःख-संकटांचे निराकरण करीत समाधानाने आयुष्य घालवीत ते संपल्यावर नाइलाजाने किंवा थोडयाफार विचाराने जगातून निघून जावे एवढाच जीवनाचा अर्थ लागतो !

परमार्थशास्त्र मानवी जीवनाचा व जगताचा असा मर्यादित अर्थ व हेतू मुळीच मान्य करीत नाही. माणसाने मानवी बुद्धीचे खरे व सर्व सामर्थ्य न जाणता तिला अतिशय मर्यादित कक्षेत अडकवून टाकिली आहे. अमर्यादाला गवसणी घालून अज, अनंत, अमर अशा परब्रह्मस्वरूपात स्थिर

होण्याची तिची झेप त्याने छाटून टाकिली आहे. ही झेप केवळ मानवी बुद्धीलाच शक्य आहे.

"पुरुषे तु एव सविस्तराम् आत्मा ।
मर्त्येन अमृतम् ईक्षती तु एव ।।" (श्रुती)

माणसातच आत्म्याचा पूर्णपणे आविर्भाव झाला आहे. तोच ज्ञान-कर्मादी साधनाने अमरपणाची इच्छा करितो. "पुरुषो वाव सुकृतम् ।।" (ऐतरेय) माणूस हीच देवाची सर्वोत्त्कृष्ट कृती आहे. आणि म्हणून संत तुकाराम महाराज सांगतात की ——

"आयुष्याचिया साधने । सच्चिदानदं पदवी घेणे ।।" आयुष्य मिळाले असता माणसाने सच्चिदानंद अशी संतमान्य पदवी मिळवावी. ती मिळविण्यासाठी——

"उत्तिष्ठत, जाग्रत,प्राप्य वरान्निबोधत" (कठ.उप.) श्रुती मानवाला सांगते की ऊठ! जागा हो! संताचेकडे जाऊन ज्ञानसंपादन कर! ह्या सच्चिदानंद पदवीच्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी (अधिकार) ज्या साधकाची जशी झालेली असेल त्याप्रमाणे त्याला शास्त्र व संत अनुरूप असा अभ्यास व उपदेश सांगतात. साधकांच्या कनिष्ठ, मध्यम व उत्तम अशा तीन श्रेणी आहेत. पूर्वजन्माचे संस्कार, बुद्धिमत्ता सत्त्वादी गुणांचे कमीजास्तपण, पुण्य, संगत वगैरे एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या परिस्थितीमुळे ही श्रेणी ठरते.

"आश्रमाः त्रिविधाः हीनमध्यमोत्कृष्टवृष्टयः ।
उपासनापदिष्टेयं तदर्थमनुकम्पया ।।" (मांडूक्यकारिका)

हीन, मध्यम व उत्कृष्ट अशा साधकांना, दयाळू असलेले संत, त्यांना करता येईल असे साधन सांगतात.

**कनिष्ठ साधक व त्याला उपदेश**

**"तैसी अहंममतेचिया लवडसवडी । मातें न पवतीचि बापुडीं
म्हणोनि जन्ममरणाची बुथडी । डहुळितें ठेली ।।"**
**(ज्ञानेश्वरी)**

'अहं'स्वरूप देहप्रेम व 'ममत्व'स्वरूप जगतावरील प्रेम ह्यांच्या उलाढालीत बिचारे अज्ञानी जीव मला येऊन मिळू शकत नाहीत व म्हणून अनंत जन्ममरणांच्या चक्रात सापडतात. मी आणि माझे हे एक अनिवार व्यसन बनते. जेवढे 'माझे' अधिक, प्रचंड व भव्य असेल तेवढा 'मी'मोठा,सुखी व सत्तावान होतो. ह्या अंध व्यसनानें इतरांच्या सुखाची व हिताची जपणूक करण्याचे भान राहत नाही. व्यसन वाढत गेले की विधि-निषेध, नीति-अनीती, पाप-पुण्य ह्यांची मुळीच चाड राहत नाही. दया, क्षमा, शान्ती हे मानवाचे खास वैशिष्टय असलेले गुण नाहीसे होऊन पशुत्व येते. मी सर्वश्रेष्ठ व्हावे व जगत् माझ्या मालकीचे असावे अशी हिटलरी महत्त्वाकांक्षा ह्यातूनच जन्माला येते ! अशा व्यक्ती साधकश्रेणीच्या जवळपासही नसतात. 'मी' व जगत् ह्यांचे स्वरूप आपण समजतो त्याहून वेगळे असणे शक्य आहे असा विचारही तेथे नसतो. त्यांचेसाठी संतांची उपदेशपद्धतीही अगदी निराळी असते.

एका महाभयंकर दरोडेखोराला एक साधू स्मशानात स्वस्थ बसलेला दिसला. त्याने साधूला तेथे बसण्याचे कारण विचारले. साधूने दरोडेखोराला ओळखून असे उत्तर दिले कीआसपासच्या भागात धुमाकूळ घालणाऱ्या एका दरोडेखोराची मी येथे वाट पाहत आहे. त्याला त्या साधूचे व त्या जागेचे फार आश्चर्य वाटले. तो साधूला म्हणाला की तो दरोडेखोर आपली गुप्त जागा सोडून ह्या स्मशानात कशाला येईल ? साधू शांतपणे म्हणाला की एक ना एक दिवस त्याला येथे यावेच लागेल ! त्याच वेळी त्या दरोडेखोराच्या वृत्तीत एकदम पालट झाला. आपले 'मी'वरील प्रेम व 'माझे'वरील लोभ किती निरर्थक आहे हे त्याला तेथेच लक्षात आले. संत त्याला सांगतात——

**"थोर असे दगा झाला त्यासी हाटी ।
सोडोनिया गाठी चोरी नेले ।।" (तुकाराम)**

जगाच्या बाजारात तुला फार मोठा दगा झाला असून तुझ्या खऱ्या हिताचे गाठोडे सोडून ते हितच चोरीला गेले आहे ! म्हणून——

**"परद्रव्य परनारीचा अभिलाष ।
तेथोनिया ऱ्हास सर्व भाग्या ।।" (तुकाराम)**

परद्रव्य व परनारीची इच्छा केल्याच्या क्षणा-

पासूनच भाग्याला उतरती कळा लागते. असा पायाभूत उपदेश करून क्रमाने त्या पशुकोटीतील माणसाला खरोखर 'माणूस' कोटीत आणल्यानंतर——

**"अगा स्वधर्म हा अपुला । जरी कां कठिण जाहला ।**
**तरी तोचि अनुष्ठिला । भला देखें ।।"** (ज्ञानेश्वरी)

——"शास्त्राने सांगितलेले स्वधर्माचरण जरी कठिण असले तरी त्यानेच खरे कल्याण होते" असे सांगून ते——"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।" अशा युक्तीने केल्यानंतर सहजच सर्व काम शांत होतात.

**"तयापरी पार्था । स्वधर्में राहाटता ।**
**सकळकाम पूर्णता । सहजे होय ।।** (ज्ञानेश्वरी)

ह्या स्वधर्माचरणाचे आड येणारे——

**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।**
**महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ।।**(गीता)

रजोगुणातून निर्माण झालेले सर्वभक्षक व अति पापी असे काम-क्रोध मोठे वैरी असून त्यांचा नाश करावा. ह्या नाशासाठी तुकाराम महाराज युक्ती सांगतात——

**"काम क्रोध आम्ही वाहिले विठ्ठली ।**
**आवडी धरिली पायांसवे ।।"**

पुढील अधिकाऱ्याच्या उपदेशाची ही पायाभरणी आहे.

विठ्ठलरूपाने येथे प्रथमच शिव, कृष्ण, राम, दत्तादिस्वरूप ईश्वराची ओळख करून देण्यात आली आहे. तो ईश्वरच जगताचा निर्माता आहे. माणसासह सर्व जीवसृष्टी त्यानेच निर्माण केली आहे. तोच त्यांना सांभाळतो व शेवटी नाहीसे करितो. एवढेच नव्हे तर जीव हा त्याचाच अंश आहे. म्हणून माणसाने मी व माझे म्हणजे जीव व जगत हे दोन्ही देवाचे आहेत असा निश्चय करावा.

**"पदार्थ, मने, काया, वाचा । मी हा अवघाचि देवाचा ।"**
(समर्थ)

——माझ्या मालकीचे सर्वकांही, माझे मन, देह, वाणी ह्यांसह असलेला मी संपूर्ण देवाचाच आहे.

**"चंचल कर्ता तो जगदीश । प्राणिमात्र त्याचा अंश**
**त्याचा तोचि आपणांस । ठाव नाही ।।"** (समर्थ)

——एक देवच सर्वत्र सर्वरूपाने असून 'मी, मी' व 'माझे' माझे' म्हणावयास खरोखर वावच नाही! असा निश्चय झाल्यानंतर माणसाचें आचरण व वृत्ती——

**"माळीयें जेउतें नेलें । तेउतें निवांतचि गेलें ।**
**तया पाणिया ऐसे केलें । होआवे गा ।"** (ज्ञानेश्वर)

माळी नेईल तिकडे बागेतील पाणी बिनतक्रार जाते, तसे असावे. आपले पुढे काय होईल, कोणत्या वृक्षाच्या मुळाला मी जाणार आहे, त्याला फुले, फळे धरतील की नाही वगैरे विचार न करिता ते 'प्राप्त कर्म' म्हणून जाते. माणसाने त्याचप्रमाणे——

**"विधीतें पाळीत । निषेधातें गाळीत ।**
**मज देउनी जाळीत । कर्म फळें ।।"** (ज्ञानेश्वर)

संत सांगतात तसे कर्माचे आचरण होत असता पापमय कर्मे टाळून कर्मफळे देवाला अर्पण करीत युक्तीने आयुष्यक्रम चालविला असता——

**तैसे येणेंचि शरीरें । शरीरा येणें सरे ।**
**किंबहुना येरझारे । चिरा पडे ।।** (ज्ञानेश्वर)

क्रमाने ह्याच आयुष्यात पुनर्जन्माचे कारण समूळ नाहीसे होते. "जन्ममरणाचे दुथडी । डुहळती ठेली" येथपासूनचा त्यांना 'चिरा पडण्याचा' प्रवास अशा रीतीने पूर्ण होतो.

### मध्यम अधिकारी व उपदेश

अहंस्वरूप देह व 'मम'स्वरूप जगत ह्यांचेविषयी असलेल्या प्रेमाला ज्याचे मनात ओहोटी लागलेली आहे व त्यांच्या खऱ्या स्वरूपाविषयी विचार व जिज्ञासा निर्माण झाली आहे, स्वधर्माचरणाने ज्याचे चित्त शुद्ध झाले असून उपासनेने स्थिर झाले आहे असा मध्यम अधिकारी असतो.

ह्या अधिकाऱ्याला सातत्याने वैराग्य वाढविण्यासाठी संत प्रोत्साहन देतात. तसेच जीव, ईश्वर, ब्रह्म ह्यांचे स्वरूपाची तात्त्विक बैठक सांगून जगत कसे आहे व ते का दिसते-भासते त्याचे श्रुतीला व युक्तीला धरून विवरण सांगतात. श्रद्धा, सद्‌गुरू व अभ्यास हे ह्या उपदेशाचें आधारस्तंभ असतात. भगवान शंकराचार्य विचारतात——

"का ते कान्ता कस्ते पुत्रः
संसारोऽयमतीव विचित्रः ।
कस्य त्वं कः कुत आयातस्
तत्त्वं चिन्तय यदिदं भ्रातः ।"

——कोण तुझी पत्नी ? कोण तुझा पुत्र ? हा संसार अत्यंत विचित्र आहे. तू कोणाचा आहेस ? कोठून आला आहेस ? ह्या सर्व रहस्याचा नीट विचार कर.

"लब्धा विद्या राजमान्या ततः किं
प्राप्ता संपत्प्राभवाढ्या ततः किम् ।
भुक्ता नारी सुंदरांगा ततः किं
येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोभूत् ।।" (शंकराचार्य)

राजमान्य विद्यांचा काय उपयोग ? मोठा अधिकार व संपत्ती मिळविल्यानंतर पुढे काय ? सुंदर पत्नीच्या सहवासात आयुष्य घालविताना त्याचे सुख किती ? जोपर्यंत आत्मसाक्षात्कार होत नाही तोपर्यंत 'पुढे काय' हा प्रश्न थांबत नाही.

"सदगुरु क्षीराब्धी अति गहन । सादरें करिता निरीक्षण ।
वेदान्तलहरी माजीं जाण । शब्द चिद्रत्ने भासती ।।
तेथ विश्वासाचा गिरीवर । वैराग्य वासुकी रविदोर ।
निजधैर्याचे मंथन तत्पर समसाम्यें ।।" (एकनाथ)

सद्गुरुरूप सागर अतिशय खोल आहे. त्याचेकडे आदराने पाहिले असता त्यावरील हेलावणाऱ्या वेदान्तरूपी तरंगांच्यामध्ये अनुभवरूप शब्दाने पैलू पाडलेली आत्मरूप रत्ने सापडतात. त्यात श्रद्धा हाच मंदारपर्वत असून वैराग्य हा त्या रवीला घुसळणारा वासुकीरूप दोर आहे. धैर्यवान देव आणि मानव त्या समुद्राचे मंथन करण्यास तत्पर असतात.

'मी व माझे'मध्ये अडकलेली मानवी बुद्धी 'मी'चे स्वरूप शोधावयास गेली तर फार तर 'शून्य' ह्या मुक्कामापर्यंत जाऊ शकते. सरडयाची धाव ह्या कुंपणाच्या पलीकडे जाऊ शकत नाही. पुढील धाव सद्गुरूंच्या पायानेच म्हणजे यथार्थ उपदेशानेच होणे शक्य असते. म्हणून श्रद्धेने सद्गुरुसेवा करून शून्याची दरी पार करता येते. मोठे मोठे तत्त्वचिंतक बुद्धी, प्राण व शून्य ह्याच्या ठिकाणी 'हेच ते आत्मतत्त्व' असे समजून फसले व थांबले. इंद्रीयातीत व शून्यापलीकडील ब्रह्मरूप आत्मतत्त्व दूरच राहिले. अशा ह्या आत्मस्वरूपाविषयी व ते अनुभवाला आणून देणाऱ्या सद्गुरूविषयी श्रद्धा नसेल तर——

"अश्रद्दधानाः पुरुषा अप्राप्य मां निवर्तन्ते । (गीता)
अश्रद्धावान पुरुष मला येऊन न मिळता जन्ममरणरूप संसाराकडे परत फिरतात" म्हणूनच——

"भूय एव तपसा, ब्रह्मचर्येण श्रद्धया संवत्सरं संवत्स्यथ" (प्रश्न उप.) 'तुम्ही तप, ब्रह्मचर्य व श्रद्धेने एकवर्षभर येथे राहा' असे पिप्पलाद मुनी आपल्या शिष्यांना सांगतात एक ध्येय समोर ठेवून चालविलेले आखीव जीवन, स्वाधीन व स्वस्थ इंद्रिये व मन तसेंच परिपूर्ण श्रद्धेने स्वाध्यायपूर्वक केलेला अभ्यास ह्यांचेमुळेच अज्ञान जाऊन 'मी व माझे'चे पूर्ण स्वरूप कळून जगत्-रूप मायेचा निरास होऊन एका आत्मस्वरूपाचे ठिकाणी मोक्षरूप विश्रांती मिळते. जगताचे स्वरूप सांगताना——

"तेचि संकल्पाची सांज जे लोपे ।
तै अखंडितचि आहे स्वरूपें ।
जैसें शंका जावळेंवो लोपे ।
सापपण माळेचे ।। (ज्ञानेश्वर)

जगत हा केवळ मनाचा खेळ असून त्या मनाचे संकल्प थांबले की ते जगत वास्तविक जसे अखंड आत्मस्वरूप असते तसेच राहते. दोरीचे जागी होणारा सर्पाचा भास नाहीसा झाला की दोरी असते तशीच राहते. जगतासह सर्वकाही आत्माच आहे असा चिद्विलासवाद किंवा जगत् हा परब्रह्मस्वरूपावरील विवर्त आहे असा विवर्तवाद ह्याचे सतत चिंतन, मनन व निदिध्यासन असा अभ्यास करून जगताच्या वास्तव स्वरूपाचा निश्चय होतो. जीवाचे स्वरूप सांगताना संत ज्ञानदेव म्हणतात——

जो परमात्माचि परी दुसरा । जो अहंकार निद्रा निदसुरा ।
म्हणून स्वप्नाचिया बोरबारा । संतोषे शिणे ।। (ज्ञानेश्वर)

वास्तविक जीव हा ब्रह्मरूपच असून केवळ अहंकाररूप जाणिवेच्या तंद्रीमध्ये त्याला जे भास

होतात त्यामुळे तो सुखे व दु:खे भोगतो. अभ्यासवाद किंवा अवच्छेदवादाचे चिंतन, मनन व निदिध्यासाने जीवाचे जीवपण जाऊन तो मूळ जसा शिवस्वरूप असतो तसा होतो. भावप्रेममय डोळस भक्तीनेही हीच प्रक्रिया सुलभतेने होते. तुकाराम महाराज म्हणतात––

मनवाचातीत तुझे हे स्वरूप ।
म्हणोनिया माप भक्ति केले ।
वाचेचिया आळा कवळिले ब्रह्म ।
सुलभ ते झाले सुलभ ते झाले ।
जवळीच आले पंढरीये ।

––"ब्रह्म हे मन व वाणीने जाणता येण्यासारखे नसल्याने ते आम्ही भक्तिस्वरूप मापात आणले व नामस्मरणाने ते मिळविले. ते आम्हाला फार सोपे झाले असून पंढरपूरला अगदी जवळ आले आहे !"

**उत्कृष्ट अधिकारी व त्याचा उपदेश**

हा अधिकारी अतिशय विरळा असून तो पूर्ण विरक्त असतो. त्याची बुद्धी अत्यंत शुद्ध, स्थिर आणि सूक्ष्मदर्शी असते. तप, ब्रह्मचर्य, अभ्यास व श्रद्धा हे त्याचे स्वभावच असतात ! जे ऐकले ते तात्काळ ग्रहण होऊन त्याचा तेथेच अनुभव घेण्याचे सामर्थ्य त्याचेपाशी असते. अशा भाग्यवान साधकाला जगताचे स्वरूप सांगताना गुरू म्हणतात––

तैसा संसार हा वीरा । मुख नाही साचोकारा ।।
मा उन्मूळणीं दरारा । कासिया तरी ।। (ज्ञानेश्वर)

––हे अर्जुना, हे जगत झालेलेच नाही ! मग त्याचे स्वरूप जाणिता येईल की नाही अशी भीती वाटण्याचे कारणच काय ? समर्थ म्हणतात––

"ठावचि नाही चंचळाचा ।
तेथें आधीं आपण कैचा ।"

मायास्वरूप जगत झालेलेच नसताना तेथे 'मी' म्हणून उपटसुंभ आलाच कोठून ?

"न कश्चित् जायते जीवः संभवोऽस्य न विद्यते ।।"
(मांडूक्यकारिका)

जीव नावाचा भावच कोठे नाही. एवढेच नव्हे तर तो निर्माण होणेही शक्य नाही. संत असा अभ्यास त्याला सांगतात व हे सर्व त्याला पडतेही! ते पटून त्याला मानवते व मुळीच न भीता तो चिंतनाने तसा अनुभवही घेतो. सामान्य माणसाला जग व जीव झालेलाच नाही ह्या कल्पनेचीही भीती वाटते !

"उपलम्भात्समाचारादस्ति वस्तुत्ववादिनाम् ।
जातिस्तु देशिता बुद्धैरजातेस्त्रसतां सदा ।" गौडपादाचार्य

पदार्थ प्रत्यक्ष दिसल्यासारखे वाटतात व त्यांना गृहीत धरून सर्व व्यवहार होत असल्याने जे लोक पदार्थ आहेत तसे खरे मानतात व अजातवादाच्या कल्पनेलाही भितात त्यांनाच जग खरे आहे असे समजून त्याच्या निराकरणाचा उपदेश सांगावा लागतो.

**उपसंहार**

सर्व संतांची शिकवण अधिकारभेदाने वेगळी वेगळी असते त्यांची परस्परांत विसंगती नसते. समर्थ शिष्याला समर्थ उपदेश ते देतात. अधिकार नसताना मोठेपणासाठी किंवा हौस म्हणून वरची उपदेशपद्धती स्वीकारली तर नुकसानच होते.

संतांच्या उपदेशपद्धतीचे मर्म लक्षात आले की त्याचे समग्र वाङ्मय वाचून घोटाळा होत नाही. त्याचेवर परम श्रद्धा बसून आत्मकल्याणाचा देवयान पंथ झपाट्याने चालता येतो.